श्री.हरिसिंग राठोड : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांच्या उत्तराने माझे बिलकूल समाधान झालेले नाही. कर्जमाफीच्या संदर्भात गोंधळाची परिस्थिती आहे. माननीय मुख्यमंत्री अभ्यासू आहेत, आपण सर्वजण अभ्यासू आहात. कर्जमाफीच्या संदर्भात काय झाले हे आपल्या कोणाच्या लक्षात आले नाही. हा विषय क्लिष्ट झालेला आहे. थकीतबाकी, इन्स्टीट्युशन क्रेडीट, ओटीएस हे सर्व झाले. काल मला आमच्या गावाकडून फोन आला. मला फोनवर विचारण्यात आले की, कर्जमाफी होणार आहे काय ? या प्रश्नाला काय उत्तर द्यावे या विचारात मी पडलो. कर्जमाफी झालेली नाही असे मी म्हटले आणि कर्जमाफी झाली तर मी खोटा पडणार. जर कर्जमाफी झाली असे तर म्हटले आणि उद्या कर्जमाफी झाली नाही तरी देखील मी खोटा पडणार आहे. मी खूप विचार करुन सांगितले की, या संदर्भात माननीय मुख्यमंत्री उद्या उत्तर देणार आहेत त्यानंतर मी सांगतो.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांच्या उत्तराने आमचे समाधान झाले असे माननीय विरोधी पक्ष नेता म्हणाले. काही सन्माननीय सदस्यांचे अंशत: समाधान झाले. माझे बिलकूल समाधान झालेले नाही. माननीय विरोधी पक्ष नेते म्हणाले की, शेतकऱ्यांच्या मनात ज्या शंका होत्या त्या माननीय मुख्यमंत्र्यांच्या भाषणातून क्लिअर झाल्या असतील. एकूण ९० लाख शेतकऱ्यांपैकी ४४ लाख शेतकरी हे थकीत कर्जदार आहेत आणि उर्वरित ५८ लाख नियमित कर्ज भरणारे शेतकरी आहेत. हे इमानदार शेतकरी आहेत, जे कष्ट करणारे शेतकरी आहेत, त्यांना या कर्जमाफीचा काही फायदा होणार नाही. येथेच सरकारचा गोंधळ उडालेला आहे तो मी समजावून सांगतो. माझे दोन भाऊ आहेत. माझ्या एका भावाने सन २००९ मध्ये कर्जमाफी घेतली आणि सन २०१० मध्ये त्याने पुन्हा कर्ज घेतले. तो थोडा उडाणटप्पू सारखा आहे. म्हणजे त्याला शेती करायची नाही. शेतीसाठी कर्ज घ्यायचे आणि कोणाला तरी शेती करण्यास द्यायची आणि स्वत: मजा करायची. दुसरा माझा भाऊ मेहनती आहे. तो शेतात घाम गाळून चांगल्या [illegible] शेती करुन कर्जाचे [illegible] हप्ते भरतो. तो [illegible] टप्पू आहे त्याला

श्री देवेंद्र फडणवीस....

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी गंगाखेड येथील साखर कारखान्याच्या बाबतीत मुद्दा मांडला. हे खरे आहे की, त्या शेतकऱ्यांना माहीत नाही की, त्यांच्या नावावर कर्ज घेण्यात आलेले आहे. परंतु आता त्यांना त्यांच्या नावे कर्ज घेतल्याचे कळेल. त्या शेतकऱ्यांनी कर्जाच्या अर्जावर सह्या केल्या नसतील तर ते कर्जमाफीसाठी अर्जच करणार नाहीत. ही कर्जमाफीची योजना नॉर्मल कोर्समध्ये ठेवली असती तर बँकेकडून कर्जदारांची यादी घेतली असती आणि २५ हजार शेतकऱ्यांच्या नावे असलेले कर्ज भरुन टाकले असते. अशाप्रकारे ज्या ज्या ठिकाणी शेतकऱ्यांच्या नावाने कर्ज घेतले आहे त्या लोकांना त्यातून कसे डीबार करता येईल आणि शेतकऱ्यांना त्यातून कसे मुक्त करता येईल याचा प्रयत्न केला जाईल.

सभापती : मी माननीय मुख्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जी बाब निदर्शनास आणून दिली ती वस्तुस्थिती आहे. कित्येक कारखान्यांनी शेतकऱ्यांच्या नावे राष्ट्रीयकृत बँका, सहकारी बँका किंवा अन्य बँकातून पीक कर्ज घेऊन ते स्वतःच्या इक्विटीमध्ये टाकलेले आहे. या पीक कर्जाची मुद्दल किंवा व्याज कारखाने भरत असतात. मला वाटते या बाबतीत आपल्याला कोठे तरी उपाययोजना करणे गरजेचे आहे.

श्री हरिसिंग राठोड : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी प्रोत्साहनपर योजनेचा उल्लेख केला. जो शेतकरी नियमित कर्ज भरतो त्याला २५ हजार रुपये किंवा २५ टक्के रक्कम प्रोत्साहन म्हणून देण्यात येणार आहे. उदाहरणार्थ माझ्या एका भावावर १ लाख रुपयांचे कर्ज आहे. जर त्याने ते कर्ज भरले नाही तर त्याला सरकारच्या प्रोत्साहनपर योजनेतून २५ हजार रुपये मिळणार नाहीत. तो इमानदार असताना, नियमित कर्ज भरणारा असताना सुध्दा त्याला सरकार काहीही दिलासा दिला जाणार नाही. माझी एवढीच अपेक्षा आहे की, सरकारने एखादी योजना आणत असताना निदान त्या बाबतचे गणित तरी बरोबर करावे. सभापती महोदय, मी

श्री.हरिसिंग राठोड....

कर्जमाफी मिळाली आणि जो मेहनती आहे त्याला कर्जमाफी मिळाली नाही. आपण ही गोष्ट लक्षात घ्यावी .

श्री.गिरीश बापट : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य उदाहरण देत आहे ते ठीक आहे. परंतु माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तरात सांगितले की, ४४ लाख शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळाली आहे. सन्माननीय सदसस्यांच्या म्हणण्यानुसार ते सर्व शेतकरी उडाणटप्पू आहेत काय ? आपण जो उल्लेख केला त्याचा असा अर्थ होतो. हे बरोबर नाही. माझी आपणास विनंती आहे की, उडाणटप्पू हा शब्द कामकाजातून काढून टाकावा.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, मघाशी माझा एक विषय सांगायचा राहून गेला. माननीय मुख्यमंत्र्यांनी त्याचा भाषणात उल्लेख केला की, मी आरोप करतो. परभणी जिल्ह्यातील गंगाखेड शुगर कारखान्याच्या बाबतीत २५ हजार शेतकऱ्यांच्या संदर्भातील विषय आहे. मागील चार वर्षात २५ हजार शेतकऱ्यांच्या नावावर ७०० कोटी रुपयांचे कर्ज एका कारखान्याने घेतले आहे.

यानंतर श्री बोर्डे....

श्री धनंजय मुंडे....

हे प्रकरण माननीय उच्च न्यायालयात सुरु आहे. माननीय उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये डी.जी. यांच्या नेतृत्वाखाली एसआयटी नेमण्यात आलेली आहे. माझी एवढीच विनंती आहे की, या कर्जमाफीचा फायदा त्या कारखानदाराला होता कामा नये कारण हा ५०० कोटी रुपयांचा प्रश्न आहे. त्या कारखानदाराने कोणालाच सोडलेले नाही. माननीय उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांच्या कुटुंबातील व्यक्तींच्या नावाने सुध्दा परस्पर कर्ज उचलण्यात आलेले आहे. हा विषय अतिशय गंभीर आहे. ज्यांनी अशाप्रकारे बँकेचे कर्ज घेतले असेल तर त्यांनी ते भरावे. परंतु राज्य सरकारने मूळ शेतकऱ्यांचे कर्ज माफ करावे. कर्जमाफीच्या योजनेमध्ये त्या कारखानदाराला कर्जमाफीचा फायदा होता कामा नये एवढेच माझे म्हणणे आहे.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी दोन-तीन मुद्दे मांडलेले आहेत. त्यांनी कुटुंबाच्या व्याख्येसंदर्भात जो मुद्दा मांडलेला त्यावर सरकारकडून विचार सुरु आहे. तसेच सैनिकांच्या बाबतीत किंवा अन्य जे मुद्दे मांडलेत ते सुध्दा खरोखरच महत्त्वाचे आहेत. राज्य सरकारने या संदर्भात जी समिती घटीत केली आहे त्या समितीमध्ये या अडलेल्या मुद्यांवर सकारात्मक व्ह्यू घेऊन या मुद्यांच्या बाबतीत निर्णय करण्यात येईल. तसेच ऑनलाईन अर्ज करण्याच्या बाबतीत सांगू इच्छितो की, मागच्या काळात मागेल त्याला शेत तळे देण्यासाठी सरकारने शेतकऱ्यांकडून ऑनलाईन अर्ज मागविले होते. त्यावेळी राज्य सरकारला वेठीस धरण्यात आले. राज्य सरकारने १ लाख शेततळ्यासाठी ऑनलाईन अर्ज मागविले असताना प्रत्यक्षात तब्बल १ लाख ८० हजार शेतकऱ्यांनी ऑनलाईन अर्ज केले. मी सांगू इच्छितो की, कर्जमाफीच्या संदर्भात ऑनलाईन पध्दतीमध्ये काही कमतरता असेल तर ऑफलाईन अर्ज स्वीकारुन ते नंतर ऑनलाईनवर टाकता येतील. त्यामुळे या कर्जमाफीपासून कोणत्याही शेतकऱ्याला वंचित ठेवणार नाही.

श्री.हरिसिंग राठोड.....

'भाऊ' हा शब्द केवळ उदाहरणादाखल वापरलेला आहे. प्रत्यक्षात माझे भाऊ खूप मेहनती आहेत. आपल्याला मी उच्चारलेला 'उडाणटप्पू' हा शब्द कामकाजातून काढून टाकायचा असेल तर काढून टाकावा. परंतु सरकार जे काही करीत आहे त्यामुळे त्यांना भविष्यात जड जाईल हे लक्षात घ्यावे.

श्री.सुजितसिंह ठाकूर : सभापती महोदय, म.वि.प.नियम २६० अन्वये मांडण्यात आलेल्या प्रस्तावावर दोन दिवस सभागृहात चर्चा झाली. आज या प्रस्तावाला माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर दिले आणि सभागृहातील एकूणच वातावरण बदलले. मी दोन दिवस या प्रस्तावावरील चर्चा ऐकत होतो. अनेक सन्माननीय सदस्य सांगत होते की, सरकार शेतकऱ्यांप्रती प्रामाणिक नाही, या सरकारला शेतकऱ्यांना लाभ मिळू द्यावयाचा नाही. मी माननीय मुख्यमंत्री आणि सरकारच्या अभिनंदनाचा उल्लेख केला, त्यावेळी कुचेष्टेने बोलले गेले. परंतु माननीय मुख्यमंत्र्यांच्या उत्तरानंतर सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी ९० टक्के समाधानी असल्याचे, काहींनी अंशत: समाधानी असल्याचे सांगितले. सन्माननीय सदस्य श्री.हरिसिंग राठोड यांनी माननीय मुख्यमंत्र्यांच्या उत्तरावर माननीय विरोधी पक्ष नेते सुध्दा समाधानी असल्याबाबतचा उल्लेख केला आहे. याबद्दल मी सर्व सन्माननीय सदस्यांना धन्यवाद देतो. या प्रस्तावावरील चर्चेच्या वेळी मी सांगितले होते की, हे सरकार शेतकऱ्यांप्रती संवेदनशील आहे. ज्या ज्या वेळी कर्जमाफीचा विषय उपस्थित करण्यात आला त्या त्या वेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी आम्ही शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या विरोधात नाही, असे सांगितले होते. खरे तर कर्जमाफीचा निर्णय हा ऐतिहासिक म्हणावा असाच आहे. देशाच्या इतिहासात ऐतिहासिक अशा कर्जमाफीचा सर्वात मोठा बहुमान जर कोणत्या राज्याला मिळाला असेल तर तो या छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्राला मिळाला. याबद्दल मी माननीय मुख्यमंत्री आणि सरकारचे पुन्हा एकदा अभिनंदन करतो.

श्री सुजितसिंह ठाकूर....

सभापती महोदय, काल सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप हे कुचेष्टेने बोलत होते. परंतु आज माननीय मुख्यमंत्र्यांच्या उत्तराच्या भाषणाच्या वेळी ते बाके वाजवून समर्थन देत होते. कालच्या तुलनेत आज बदलले सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप मी या सभागृहात बघितले, याचा मला आनंद वाटतो. माननीय सभागृह नेत्यांनी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी सांगितले होते की, हे सरकार शेतकऱ्यांच्या बाबतीत ठाठर नाही तर लवचिक आहे. आज माननीय मुख्यमंत्र्यांनी पुन्हा एकदा शेतकऱ्यांच्या बाबतीत दाखवून दिले की, हे सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे. मी पुन्हा एकदा महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या वतीने माननीय मुख्यमंत्री आणि सरकारचे मनःपूर्वक आभार मानतो. धन्यवाद.

**सभापती** : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे.

सभागृहाची बैठक उद्या शुक्रवार, दिनांक २८ जुलै, २०१७ रोजी सकाळी १०.०० वाजता पुन्हा भरेल. सकाळी १०.०० ते ११.४५ वाजेपर्यंत सभागृहाची विशेष बैठक घेण्यात येईल. या विशेष बैठकीत आजच्या कामकाजपत्रिकेतील लक्षवेधी सूचना व अर्धा-तास चर्चा घेण्यात येतील. त्यानंतर सभागृहाची नियमित बैठक दुपारी १२.०० वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी ५ वाजून ५८ मिनिटांनी शुक्रवार, दिनांक २८ जुलै, २०१७ रोजीच्या सकाळी १०.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-------